आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

०१ मे २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र राज्यस्थापनेचा ६५वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमांनी साजरा

- पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी राज्य सरकार सर्व समाजघटकांना सोबत घेऊन प्रगती करत असल्याचा राज्यपालांनी व्यक्त केला विश्वास

- राज्य शासकीय कार्यालयांसाठीच्या सुधारणा मोहिमेच्या पहिल्या १०० दिवसांचं मूल्यमापन जाहीर/ महिला आणि बालकल्याण विभाग सर्वोत्तम

**आणि**

- वेव्हज् जागतिक परिषदेचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. मुंबईत यानिमित्त झालेल्या कार्यक्रमांचा थोडक्यात आढावा आमच्या प्रतिनिधीकडून….

**होल्ड- कॅप्सूल- व्हॉईसकास्ट- तुषार( बाईट- मुख्यमंत्री)**

महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हामुख्यालयं, राज्यसरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालयं तसंच निमसरकारी संस्था आणि विविध राजकीय पक्षांच्या मुख्यालयांमधे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदनेचे कार्यक्रम झाले.

दिल्लीच्या महाराष्ट्र परिचय केंद्रातही महाराष्ट्र दिन साजरा झाला.

**<><><><><>**

**सातान्यात** पालकमंत्री शंभूराजे देसाई यांनी छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात ध्वजवंदन केलं. **बीड** इथं मुख्य शासकीय ध्वजवंदन सोहळा उद्योग आणि सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पार पडला.**जालना** येथील पोलीस मुख्यालय मैदानावर पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. **लातूर**मध्ये पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी ध्वजवंदन केलं. **रायगड** जिल्ह्यात अलिबाग इथं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात झालं. **परभणी** इथं पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी तर **रत्नागिरीत** पालकमंत्री उदय सामंत यांनी ध्वजवंदन केलं. **धुळ्यात** पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते तर **भंडारा** इथं पालकमंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते ध्वजवंदनेचा कार्यक्रम झाला. **चंद्रपूर** इथं पालकमंत्री अशोक उईके यांच्या, **हिंगोलीत** पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या, तर **अकोला** इथं पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं. **धाराशिव** इथं पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी तर अहिल्यानगर इथं पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ध्वजवंदन केलं. **बुलढाणा** पोलीस परेड मैदानावर पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते शासकीय ध्वजवंदन सोहळा पार पडला. **नांदेड** इथं पालकमंत्री अतुल सावे, **गोंदियात** पालकमंत्री बाबासाहेब पाटील, यवतमाळ मध्ये पालकमंत्री संजय राठोड, **वाशिम** इथं पालक मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन सोहळा झाला. **नवी मुंबई महापालिका** मुख्यालयात आयुक्त कैलास शिंदे यांनी ध्वजवंदन केलं.

**<><><><><>**

राज्यात शासकीय कार्यालयांसाठीच्या सुधारणा मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचं मूल्यमापन आज जाहीर झालं. कार्यक्षम संकेतस्थळ, कार्यालयीन तसंच तक्रार निवारण सुविधा, तंत्रज्ञानाचा वापर अशा दहा मुद्द्यांवर भारतीय गुणवत्ता परिषदेनं

केलेल्या या मूल्यमापनानुसार ४८ विभागांपैकी १२ विभागांनी १०० टक्के उद्दिष्ट प्राप्त केलं आहे.

या शंभर दिवसांच्या मूल्यमापनात महिला आणि बालविकास विभाग सर्वोत्तम ठरला आहे तर त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग आणि परिवहन आणि बंदरे विभाग हे मंत्रालयीन विभाग उदिष्टप्राप्ती विभागात यशस्वी ठरले आहेत.

तंत्रशिक्षण संचालक, जमाबंदी आयुक्त, ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि वैद्यकीय शिक्षण आयुक्त हे अनुक्रमे सर्वोत्तम आयुक्त किंवा संचालक म्हणून जाहीर झाले आहेत.

तर जिल्ह्याधिकाऱ्यांच्या मूल्यमापनात चंद्रपूर, कोल्हापूर, जळगाव, अकोला आणि नांदेड या जिल्हाधिकाऱ्यांनी यश मिळवलं आहे.

सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त विभागात उल्हासनगर, पिंपरी-चिंचवड, पनवेल आणि नवी मुंबई या इथल्या आयुक्तांनी आघाडी घेतली आहे.

सर्वोत्तम विभागीय आयुक्त म्हणून अनुक्रमे कोकण, नाशिक आणि नागपूर या विभागीय आयुक्तांनी क्रमांक पटकावला आहे.

**<><><><><>**

जागतिक अर्थव्यवस्थेतलं कामगारांचं योगदान अधोरेखित करण्यासाठी आज कामगार दिन साजरा केला जातो. कामगारांचे कामाचे तास आठ तासापर्यंत मर्यादित करण्यासाठी अमेरिकेत झालेल्या आंदोलनापासून एक मे हा दिवस कामगार दिन म्हणून ओळखला जातो. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जागतिक कामगारदिनानिमित्त सर्व कामगारांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

वेव्हज् हा फक्त एका परिषदेचं संक्षिप्त नाव नाही, तर खरोखर एक सांस्कृतिकतेची, सर्जनशीलतेची, जागतिक स्तरावर परस्परसंबंधांची लाट आहे,

असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मुंबईत जिओ वर्ल्ड कन्वेन्शन सेंटर इथे सुरू असलेल्या वेव्हज् अर्थात जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

**होल्ड... बाईट - नरेंद्र मोदी (24 सेकंद)**

वेव्हज् हे एक असं जागतिक व्यासपीठ आहे. जे तुमच्यासारख्या प्रत्येक कलाकाराचं आहे. त्यामुळे प्रत्येक कलावंत सर्जनशीलतेच्या जगाशी जोडला जाईल, असंही ते यावेळी म्हणाले. यावेळी मोदी यांनी ३२ विविध स्पर्धांमधून अंतिम फेरीत पोहोचलेल्या ८०० स्पर्धकांचं अभिनंदनही केलं.

तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत असताना जगात मानवी संवेदना जागृत ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. भारताच्या देशांतर्गत सकल उत्पादनामध्ये सर्जनशील अर्थव्यवस्थेचा हिस्सा वाढायला मदत होईल, असंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. या परिषदेबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***व्हॉईस कास्ट- रश्मी***

***(क्रियेटिव्हिटीला प्रोत्साहन देणं आणि तिला जगभरात पोहोचवण्यासाठी कनेक्टिव्हिटी देणं या उद्देशाने वेव्हज् या पहिल्या जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन परिषदेचं आयोजन मुंबईत करण्यात येत आहे. या परिषदेला परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. वेव्हज् परिषदेमुळे देशातल्या आशय निर्मात्यांना जगभरातल्या गुंतवणूकदारांशी संपर्क निर्माण करण्याची संधी मिळत आहे, असं मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. या परिषदेत देशातले ७६हून जास्त नेते आणि उद्योगक सहभागी होत असून***

***यामुळे मनोरंजन आणि नवनिर्मिती क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर मुंबईचं स्थान बळकट व्हायला मदत होईल, असंही ते यावेळी म्हणाले. वेव्हज् ही केवळ एक परिषद नसून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली एक चळवळ असल्याची प्रतिक्रिया अभिनेता शाहरुख खान यांनी दिली आहे. या परिषदेला चित्रपटसृष्टीतून शाहरुख खान, रजनीकांत, अक्षय कुमार, विकी कौशल, प्रसून जोशी, सारा अली खान, सैफ अली खान, दीपिका पदुकोण, शाहीद कपूर, बॉबी देओल, आमीर खान, आलिया भट, रणबीर कपूर, मनीषा कोईराला, नुशरत भरूचा, शोभिता धुलिपाला, अनिल कपूर, अनुपम खेर यांच्यासह मनोरंजन क्षेत्रातले अनेक मान्यवर उपस्थित होते.)***

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात भारत सर्जनशीलतेचं शक्तिकेंद्र म्हणून जगाचे नेतृत्व करायला भारत तयार आहे, हे वेव्हज् परिषदेमुळे लक्षात येत असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी केलं.

**//<><><><><>//**